**सचिव बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र,संस्था चिचपल्ली यांचे कार्यालय**
(स्थित-चंद्रपूर) आकाशवाणी जवळ, बंगला नं.२८, चंद्रपूर-४४२४०१ (महाराष्ट्र)
दूरध्वनी क्र.-०७१७२ २७२९९९ E-mail :- brtcchichpalli@gmail.com

क्रमांक-BRTC संस्था/३२ /२०२१-२२ **चंद्रपूर,दिनांक :-२७.१०.२०२१**

# जाहिर सुचना

**बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली स्थित-चंद्रपूर अंतर्गत सध्यास्थित कार्यान्वीत असलेल्या सामुहिक उपयोगीता केंद्र साकोली, गोंडपिपरी, गडचिरोली, वर्धा, चंद्रपूर व इतर जिल्हयात/राज्यात भेटी देवून त्याठिकाणी कार्यरत कारागीरांना प्रशिक्षण देण्यासाठी अनुभवी कारागीरांची आवश्यकता असल्याने अनुभवी कारागीरांची पॅनल तयार करणे बाबत.**

**कालावधी**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| 1 | जाहीर सूचना प्रसिद्ध करण्याची दिनांक | २७.१०.२०२१ |
| 2 | अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख | ०८.११.२०२१ |
| 3 | अर्जाची तपासणी व मुलाखतीकरिता अंतिम यादी प्रसिध्द करणे | ०९.११.२०२१ |
| 4 | मुलाखत दिनांक | १२.११.२०२१ |
| 5 | अंतिम यादी प्रसिध्द करणे | १५.११.२०२१ |

**बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली अंतर्गत निवड समितीव्दारे आवश्यक उमेदवारांची पॅनल निवड करावयाची असल्याने, इच्छुक अर्जदारांनी अर्ज सादर करतांना खालील सुचनांनुसार अर्ज सादर करणेची कार्यवाही करावी.**

- ❖ **पॅनलमध्ये एकुण आवश्यक कारागीरांची संख्या** - 10
- ❖ नियुक्तीसाठी आवेदन सादर करणारा अर्जदार हा बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली (BRTC मार्फत/प्रायोजित करण्यात आलेले BCDI, बांबू पेकर व इतर प्रशिक्षण ठिकाण, औद्योगिक संस्था, NGO, ट्रस्ट, इत्यादी मध्ये घेतलेले प्रशिक्षणसुद्धा समाविष्ट आहे.) अंतर्गत प्रशिक्षण घेतलेला असणे अनिवार्य राहील.
- ❖ वरील निवडीसाठी उमेदवाराचे वय अर्ज सादर करण्याचे दिनांकास 21 ते 45 वर्ष असणे गरजेचे राहील.
- ❖ वरीलप्रमाणे दोन्ही अटी पुर्ण करित असलेल्या उमेदवारांचे अर्जांचा विचार करण्यात येईल, वरील दोन्ही अटी पुर्ण करीत नसलेल्या उमेदवारांचे अर्जाचा मुलाखत व ईतर चाचणीकरिता विचार केला जाणार नाही. अर्ज सादर करतांना वरील दोन्ही सुचनांबाबत पुराव्याबाबत दस्ताऐवज सोबत जोडण्यात यावा.
- ❖ नियुक्तीसाठी आवेदन सादर करणारा अर्जदार हा बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली अंतर्गत कमीत कमी 1 वर्ष कारागीर म्हणुन काम केलेला असणे अनिवार्य राहील.
- ❖ अर्जदारास यंत्रसामुग्रीबाबत पुरेसे ज्ञान असणे आवश्यक राहील तसेच आधुनिक तंत्रज्ञानानुसार मशिन हाताळणे व मशिन परिरक्षणाबाबत (मेंटनन्स) अनुभव व माहिती असणे गरजेचे राहील.
- ❖ आवश्यक 10 कारागीरांपैकी 4 हॅन्डीक्रॉप्ट कारागीर, 3 टर्निंग कारागीर, 2 बास्केट्री कारागीर व 1 फर्निचर कारागीरांची निवड करण्यात येईल.

❖ निवड करण्यात येणा-या कारागीरांची एक पॅनल तयार करण्यात येईल व ही पॅनल नियुक्तीच्या अंतिम निकालाच्या दिनांकापासून १ वर्षापर्यंत कार्यरत राहील. जेव्हा-जेव्हा काम उपलब्ध राहील त्यानुसार नियुक्त कारागीरास बोलाविण्यात येईल याबाबत पुर्ण अधिकार सचिव, निवड समिती, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली यांचेकडे राहील.

❖ या विभागांतर्गत ज्या ठिकाणी प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे त्यानुसार संबधीत कारागीरांना घेण्यात येईल व प्रशिक्षण देणे उपलब्ध नसल्यास निवड करण्यात येणा-या कारागीरांना कोणत्याही प्रकारचे मानधन अनुज्ञेय राहणार नाही.

❖ प्रशिक्षण देण्याचे कालावधीमध्ये कारागीरांना बाहेरगांवी व ईतर राज्यामध्ये जावून, त्याठिकाणी राहून प्रशिक्षण देणे अनिवार्य/बंधनकारक राहील. कोणत्या कारागीरास कुठे पाठवावयाचे याबाबतचा निर्णय सचिव, निवड समिती, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली यांचेकडे राहील.

❖ प्रशिक्षण कालावधीमध्ये निवड करण्यात येणा-या प्रशिक्षक कारागीरांना मानधनाशिवाय ईतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.

❖ बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली संबधात महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण (मॅट) मध्ये दिलेल्या दिनांक 25.02.2020 चे निर्णयानुसार संबधीत व्यक्तींना कौशल्य व कामाचे उपलब्धतेनुसार विचार करण्यात येईल.

❖ गुणांचे वाटप (Marks Distribution)

| अ.क्र. | तपशिल | कमाल गुण | गुणांचा सविस्तर तपशिल |
|---|---|---|---|
| 1 | BRTC मध्ये प्रशिक्षण घेतले असल्यास<br>(BRTC मार्फत/प्रायोजित करण्यात आलेले BCDI, बांबू पेकर व इतर प्रशिक्षण ठिकाण, औद्योगिक संस्था इत्यादी मध्ये घेतलेले प्रशिक्षणसुद्धा समाविष्ट आहे.) | २० गुण | १० गुण प्रती प्रशिक्षण |
| 2 | BRTC/CFC मध्ये कारागीर म्हणुन काम केलेले असल्यास | ४० गुण | १० गुण - १२ महिने<br>१० गुण- २४ महिने<br>१० गुण- ३६ महिने<br>१० गुण- ४८ महिने |
| 3 | २५.२.२०२० रोजीचे मॅट मधील निर्णयातील अर्जदार असेल तर | १० गुण | |
| 4 | मुलाखत | १० गुण | |
| | **एकूण-** | **८० गुण** | |
| ५ | कौशल्य चाचणी (Skill Test) | ६० गुण | |
| ६ | सादरीकरण (Presentation skill) | १० गुण | |

❖ निवड समितीव्दारे घेण्यात येणा-या निवड प्रक्रियेमध्ये कौशल्य विकास चाचणी, मुलाखत व सादरीकरण अशा तिनही प्रक्रीयेनुसार उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवारास Skill test व Presentation test मध्ये कमीत कमी 60 टक्के गुण प्राप्त करणे अनिवार्य आहे.

❖ वरील कामाकरिता निवड करण्यात येणा-या उमेदवारांसंबधी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

❖ निवड करण्यात येणा-या १० ही कारागीरांना एकाच वेळी काम मिळेल याची खात्री देता येणार नाही. कामाचे उपलब्धतता व गुणानूक्रमे (मेरीटनुसार) कारागीरांना काम उपलबध करुन देण्यात येईल. काम उपलब्ध झालेनंतर कारागीर सदर कामासाठी प्रशिक्षणाचे कालावधीत उपस्थित झाले नाही तर त्यांना तयार करण्यात आलेल्या कारागीरांचे पॅनलवरुन सुचना न देता बाहेर काढण्यात येईल.

❖ निवड करण्यात येणा-या कारागीरांना पूर्ण वर्षभर सलग काम मिळेलच याची सुध्दा खात्री देता येणार नाही.

- ❖ वरीलप्रमाणे निवड प्रक्रियेत फेरबदल करण्याचे संपुर्ण अधिकार निवड समिती किंवा निवड समितीने अधिकृत केलेल्या व्यक्तीस राहील.
- ❖ वरील पॅनलची नियुक्ती BRTC संस्थे अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात असून उमेदवारास सरकारी नौकरीसाठी दावा करता येणार नाही.
- ❖ पॅनलची नियुक्ती झालेनंतर BRTC संस्थेसोबत उमेदवारास करारनामा करणे बंधनकारक राहील.
- ❖ सदरची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपात असुन कामाचे उपलब्धतेनुसार असल्याने, निवड करण्यात येणा-या उमेदवारास BRTC मार्फत सलग काम उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहणार नाही.
- ❖ उमेदवारांनी वरील निवडीसाठी सोबत जोडल्या अर्जाचे विहीत नमुन्यात (जोडपत्र-1) अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
- ❖ अर्ज सादर करण्या-या उमेदवारास अर्जाचे नमुन्यातील हमीपत्र (जोडपत्र-2) भरुन स्वाक्षरी करणे अनिवार्य आहे.
- ❖ **अपुर्ण अर्ज व हमीपत्रा अभावी उमेदवारास मुलाखत व ईतर चाचणीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.**
- ❖ नियुक्ती करण्यात येणा-या कारागीरांचे पॅनल बाबत सदर कालावधीमध्ये कोणत्याही नियमात बदल करण्याचे अधिकार निवड समिती व निवड समितीने अधिकृत केलेल्या व्यक्तीस राहील.
- ❖ **पॅनलची नियुक्तीकरिता प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने १० पैकी कमी अर्ज प्राप्त झाले तरी सुद्धा पॅनल निवडीबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल.**
- ❖ सदर जाहीर सूचनामध्ये कोणतीही अटी व शर्तीमध्ये केव्हा पण बदल करण्याचे अधिकार निवड समिती व निवड समितीने अधिकृत केलेल्या व्यक्तीकडे राहील.
- ❖ सदर पॅनलची नियुक्तीस कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे वा स्थगिती देण्याचे अधिकार सुद्धा निवड समिती व निवड समितीने अधिकृत केलेल्या व्यक्तीकडे राहील.

**स्वा/-**

सदस्य सचिव BRTC संस्था तथा
संचालक
बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली
स्थित-चंद्रपूर

# बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली

( स्थित-चंद्रपूर )

(अनुभवी कारागीर प्रशिक्षकांसाठी अर्ज)

## अर्जाचा नमुना

फोटो

1) अर्जदाराचे पूर्ण नाव - ..........

2) अर्जदाराचा पूर्ण पत्ता - ..........

3) जन्म तारीख - ..........

4) वय (अर्जाचे दिवशी) - ..........

5) वयोमर्यादा - .......... (किमान 21 – कमाल 43)

6) मोबाईल क्र. - ..........

7) जात - ..........

8) जातीचा प्रवर्ग - ..........

9) ई-मेल आयडी (असल्यास) ..........

10) शैक्षणिक अर्हता - ..........

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी/ग्रेड | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

11) अनुभव (असल्यास) ..........

a) प्रशिक्षणाचे नाव : ..........

b) कालावधी : ..........

c) प्रशिक्षण घेतलेल्या संस्थेचे नाव : ..........

d) ठिकाण : ..........

12) अर्ज करावयाचे पद : अ) हँडीक्राफ्ट ☐ ब) टर्निंग ☐ क)बास्केट्री ☐ ड) फर्निचर ☐

(**टीप** : अर्जदाराने अर्ज करावयाच्या पदासमोर ✓ मार्क करावे. तसेच अर्जदारास वरीलपैकी केवळ एकाच पदासाठी अर्ज करता येईल याबाबत नोंद घ्यावी.)

निवडीबाबत दिलेल्या निकषानुसार व अटी शर्तीनुसार उपरोक्त माहिती सत्य आहे. सदर माहिती खोटी आढळल्यास नियमानुसार मी कार्यवाहीस पात्र राहील.

**दिनांक :-**

**(अर्जदाराची सही)**

**टीप :- अर्जासोबत शैक्षणिक पात्रता खालील दस्ताऐवजांच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.**

1) वयाचा दाखला (टी.सी.)
2) शैक्षणिक अर्हता (गुणपत्रिका प्रमाणपत्र)
3) जातीचे प्रमाणपत्र
4) रहिवासी दाखला
5) अनुभव प्रमाणपत्र (असल्यास)
6) आधारकार्ड

**(वरील सर्व प्रमाणपत्र राजपत्रीत अधिकाऱ्याकडून किंवा स्वत: प्रमाणित करून घ्यावे.)**

जोडपत्र-2

# <u>हमीपत्र</u>

मी श्री/कु. . . . . . . . . . . वडीलाचे नांव. . . . . . . . . . आडनांव . . . . . . . ..रा.. . . . . . .. ता.. . . . . . . . .. . . जि. . . . . . . . .. . . . . कारागीर पॅनल निवडी बाबत सर्व अटी व शर्ती पुर्णपणे वाचलेल्या असून, जाहिर सुचना व अर्जात दिलेला सर्व अटी व शर्ती मला मान्य आहे. अर्जातील माहीती खोटी आढळुन आल्यास मी नियमाप्रमाणे कार्यवाहीस पात्र राहील.

ठिकाण- अर्जदाराची स्वाक्षरी

दिनांक